प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

डिसेंबर 3, 2018

**दिलीप अर्बन को-ऑपरेटिव बँक लि., बार्शी, सोलापुर हयांचेवर आरबीआयकडून आर्थिक दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46(4) सह वाचित कलम 47अ(1)(ब) खाली देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने दिलीप अर्बन को-ऑपरेटिव बँक लि., बार्शी, सोलापुर, हयांचेवर रु.2.00 लाख (रुपये दोन लाख) दंड लागु केला असून, तो दंड, गुंतवणुकी व नॉन एसएलआर गुंतवणुकीवरील प्रुडेंशियल मर्यादांबाबत आरबीआयच्या सूचना/मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन केले गेल्याने लागु करण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने, वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर त्या बँकेने तिचे लेखी उत्तर सादर केले होते. हया प्रकरणातील सत्य विचारात घेऊन रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की उल्लंघने झाल्याचे सिध्द होत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/1273**